अर्थसंकल्पीय अनुदान सन २०२५-२६ मधुन मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत क्षमताबांधणी, प्रशिक्षण, IEC व प्रसिद्धी साठी निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१५६५१३९/यो-११**
**बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**
**दिनांक : २७ फेब्रुवारी,२०२६**

वाचा :

(१) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-११२३०५७/यो-११, दि.०६.०८.२०२५

(२) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-१२६६३३३/यो-११, दि.३१.१२.२०२५

प्रस्तावना :

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस, कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरिता राज्यात **" मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान "** राबविण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर अभियानाची सुरुवात दि.१७.०९.२०२५ पासून झाली असून सन २०२५-२६ वर्षाकरिता सदर अभियानाचा कालावधी संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि. ३१.०३.२०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

२. सदर अभियानाची पूर्व तयारी दि.०१.०८.२०२५ पासून सुरू करण्यात आली असून अभियानाच्या विविध घटकांचे महत्त्व व त्यामधून अपेक्षित साध्य याची माहिती जनतेपर्यंत पोहोचण्याकरिता जिल्हा, तालुकास्तरांवर कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अभियानामध्ये जनतेचा/ग्रामपंचायतींचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्याकरिता जिल्हा व तालुका स्तरावर विविध उपक्रम व व्यापक प्रचार प्रसिद्धी सुरू आहे. विभागाच्या दि.०६.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, क्षमता बांधणी, प्रशासकीय खर्च, प्रचार प्रसिद्धी, कार्यशाळा, प्रशिक्षण, मेळावे, तांत्रिक सल्लागार इ. बाबींसाठी प्रति जिल्हा परिषद रु.४०.०० लक्ष व प्रति पंचायत समिती रु.३.०० लक्ष याप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

३. विधानमंडळाच्या डिसेंबर, २०२५ च्या अधिवेशनात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत २५१५ २७७१, ३१ सहायक अनुदाने लेखाशीर्षाखाली मंजूर पूरक मागणीमधून, वित्त विभागाने ७०% च्या

Scanned with OKEN Scanner

मर्यादेत रु.१६.८९ कोटी निधी वितरणासाठी उपलब्ध करून दिला आहे. त्याअनुषंगाने क्षमता बांधणी, प्रशासकीय खर्च, प्रचार प्रसिद्धी, कार्यशाळा, प्रशिक्षण, मेळावे, तांत्रिक सल्लागार इ. बाबींसाठी, मंजूर तरतुदीच्या ७० % प्रमाणात प्रति जिल्हा परिषद २८.०० लक्ष प्रमाणे व प्रति पंचायत समिती रु.२.१० लक्ष प्रमाणे एकूण रु.१६,८९,००,०००/- (रु.सोळा कोटी एकोणनव्वद लक्ष) इतका निधी संबंधित जिल्हापरिषदांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

**सन २०२५-२६ या वर्षाकरिता मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या क्षमता बांधणी, प्रशासकीय खर्च, कार्यशाळा, प्रशिक्षण, मेळावे, कलापथक, तांत्रिक सल्लागार, IEC व प्रसिद्धी साठी मंजूर तरतुदीच्या ७० % प्रमाणात, प्रति जिल्हा परिषद २८.०० लक्ष प्रमाणे व प्रति पंचायत समिती रु.२.१० लक्ष प्रमाणे एकूण रु.१६,८९,००,०००/- (रु.सोळा कोटी एकोणनव्वद लक्ष) इतका निधी जिल्हा परिषदांना वितरित करण्यात येत आहे. सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | जिल्हा परिषदेसाठी वितरीत करावयाची रक्कम रू. लक्ष | पंचायत समित्यांसाठी वितरीत करावयाची एकूण रक्कम रु. लक्ष | वितरीत करावयाची एकूण रक्कम रु.लक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | कोकण | ठाणे | २८.०० | १०.५० | ३८.५० |
| २. | | पालघर | २८.०० | १६.८० | ४४.८० |
| ३. | | रायगड | २८.०० | ३१.५० | ५९.५० |
| ४. | | रत्नागिरी | २८.०० | १८.९० | ४६.९० |
| ५. | | सिंधुदुर्ग | २८.०० | १६.८० | ४४.८० |
| ६. | पुणे | पुणे | २८.०० | २७.३० | ५५.३० |
| ७. | | सातारा | २८.०० | २३.१० | ५१.१० |
| ८. | | सांगली | २८.०० | २१.०० | ४९.०० |
| ९. | | सोलापूर | २८.०० | २३.१० | ५१.१० |
| १०. | | कोल्हापूर | २८.०० | २५.२० | ५३.२० |
| ११. | नाशिक | नाशिक | २८.०० | ३१.५० | ५९.५० |
| १२. | | अहिल्यानगर | २८.०० | २९.४० | ५७.४० |
| १३. | | जळगाव | २८.०० | ३१.५० | ५९.५० |
| १४. | | धुळे | २८.०० | ८.४० | ३६.४० |
| १५. | | नंदुरबार | २८.०० | १२.६० | ४०.६० |
| १६. | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | २८.०० | १८.९० | ४६.९० |
| १७. | | जालना | २८.०० | १६.८० | ४४.८० |
| १८. | | परभणी | २८.०० | १८.९० | ४६.९० |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९. | | हिंगोली | २८.०० | १०.५० | ३८.५० |
| २०. | | नांदेड | २८.०० | ३३.६० | ६१.६० |
| २१. | | बीड | २८.०० | २३.१० | ५१.१० |
| २२. | | लातूर | २८.०० | २१.०० | ४९.०० |
| २३. | | धाराशिव | २८.०० | १६.८० | ४४.८० |
| २४. | अमरावती | अमरावती | २८.०० | २९.४० | ५७.४० |
| २५. | | अकोला | २८.०० | १४.७० | ४२.७० |
| २६. | | यवतमाळ | २८.०० | ३३.६० | ६१.६० |
| २७. | | वाशिम | २८.०० | १२.६० | ४०.६० |
| २८. | | बुलढाणा | २८.०० | २७.३० | ५५.३० |
| २९. | नागपूर | नागपूर | २८.०० | २७.३० | ५५.३० |
| ३०. | | भंडारा | २८.०० | १४.७० | ४२.७० |
| ३१. | | गोंदिया | २८.०० | १६.८० | ४४.८० |
| ३२. | | चंद्रपूर | २८.०० | ३१.५० | ५९.५० |
| ३३. | | गडचिरोली | २८.०० | २५.२० | ५३.२० |
| ३४. | | वर्धा | २८.०० | १६.७० | ४४.७० |
| | **एकूण** | | **९५२.००** | **७३७.००** | **१६८९.००** |

२. उपरोक्त निधी वितरीत करण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी वितरीत करावयाच्या रकमा कोषागारातून काढुन संबंधितांना प्रदान करण्याची व्यवस्था करावी. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर खर्चाची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

३. वरील खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र महालेखाकार कार्यालयास सादर करून त्याची प्रत शासनास सादर करावी. तसेच महालेखापालांच्या लेख्याशी खर्चाच्या ताळमेळाबाबतची कार्यवाही करावी. तसेच विहीत कालावधीत निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

४. सदर खर्च मागणी क्र.एल-३, २५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, १०१- पंचायतराज (०१) पंचायत राज संस्थांना सहायक अनुदान (०१) (१३) मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत प्रोत्साहनपर अनुदाने (कार्यक्रम), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) (२५१५ २७७१) या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ या वर्षात खर्ची टाकण्यात यावा.

५. प्रस्तुत प्रकरणी वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ व शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.२९.०१.२०२६ मधील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.



Scanned with OKEN Scanner

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. ५९/व्यय-१५, दि.१२.०२.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२२७१४२४४०८४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAGAR SURESH MANORE

Digitally signed by SAGAR SURESH MANORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RDD, 2.5.4.20=1D70DF32CC6C50DE99C87FB7AFB9A7374B4BAF59A5F2BD0E66326738EF128208, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=588F78CC5AE9E0365D3D59EE42992487284SADC4FC8F9F4A3526F4FE39804D78, cn=SAGAR SURESH MANORE
Date: 2026.02.27 18:10:33 +05'30'

(सागर मनोरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.विधानसभा/ विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई,
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
११. अधिदान व लेखा अधिकारी,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१२.मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व),
१३.विभागीय आयुक्त (सर्व),
१४. जिल्हाधिकारी (सर्व);
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
१६.जिल्हा कोषागार अधिकारी,(सर्व),
१७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
१८.अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-१५),मंत्रालय, मुंबई-३२,
१९. अवर सचिव, नियोजन विभाग (कार्या-१४४४), मंत्रालय ,मुंबई-३२,
२०. कक्ष अधिकारी (वित्त -१) ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई,
२१. निवड नस्ती (यो-११).



Scanned with OKEN Scanner